महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२०/ बारावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/कॅप फेरी/ १००९ दिनांक : ०३/१२/२०२०

**प्रवेशासाठीचे वेळापत्रक**

**केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेरी**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पोस्ट एचएससी पुर्णवेळ पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी विकल्प अर्ज भरुन निश्चित करणे, कॅप जागा वाटप, झालेले जागा वाटप स्वीकारण्यापूर्वी स्वत: पडताळणी करणे, जागा वाटप स्वीकारणे, जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उमेदवारांनी उपस्थित राहणे या प्रक्रियेच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी १ | | | |
|---|---|---|---|
| अनु.क्र | प्रक्रिया | पहिली तारीख | अंतिम तारीख |
| १. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा (जागांची रचना) प्रदर्शित करणे. | ११-१२-२०२० | |
| २. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | १२-१२-२०२० | १४-१२-२०२० |
| ३. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | १६-१२-२०२० | |
| ४. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>क) उमेदवारांनी त्याला/तिला पहिल्या कॅप फेरीमध्ये दिलेले जागा वाटप हे नियमांनुसार आहे किंवा नाही याची पडताळणी स्वत: करावी. उमेदवारांनी त्याच्या/ तिच्या लॉगिनमधून पात्रता गुण, प्रवर्ग, लिंग, आरक्षण, स्वत: हून केलेले स्वत: चे विशिष्ट आरक्षण इ. संबंधीचे उमेदवारांनी केलेले दावे वरोबर आहेत याची खात्री करुन घ्यावी. तसेच त्याने/तिने दाखल केलेले दावे योग्य व वरोबर असल्यावावतचे सुसंगत कागदपत्रे अपलोड केलेले आहेत याची खात्री करावी.<br>ख) जर उमेदवारांला, उमेदवारी अर्जाच्या नमुन्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळून आले आणि त्याला त्याची चूक दुरुस्त करण्यासाठी (माहितीपुस्तिकेमधील नियम (९) पोट-नियम (४) च्या खंड (ङ) नुसार, चुका दुरुस्त करण्याचे प्रयोजन), उमेदवाराने त्याच्या लॉगिनमधून ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे तक्रार/हरकत नोंदवावी.<br>ग) ज्या उमेदवारास पहिल्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाच्या जागेचे (ऑटोफ्रीझ्ड) वाटप झाले असेल, अशा उमेदवारांनी वाटप झालेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरीमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.<br>घ) ज्या उमेदवारास पहिल्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या | १७-१२-२०२० | १८-१२-२०२० |

| | | | |
|---|---|---|---|
| | पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झालेले आहे व ती जागा त्यांच्या लॉगिनमधून स्वत: "फ्रीझ" केली आहे अशा उमेदवारांनी वाटप केलेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरीमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.[उमेदवाराने हा पर्याय काळजीपूर्वक वापरला पाहिजे]<br>ङ) ज्या उमेदवारांना त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झाले आहे व जे उमेदवार पुढील फेरीमध्ये वरच्या पसंतीक्रमाची जागा मिळविण्याकरिता सहभागी होण्यास इच्छुक असतील अशा उमेदवारांनी पहिल्या फेरीमध्ये मिळालेल्या जागेचा "बेटरमेंट" पर्याय निवडून स्वीकार करणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. | | |
| ५. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>टिप:<br>क) उपरोक्त ४ (ग) व ४ (घ) नुसार जागा स्वीकारलेल्या उमेदवारांनी प्रवेशाच्या निश्चितीकरणासाठी जागावाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.<br>ख) संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारास प्रवेशाच्या पुष्टीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती व शुल्क भरल्याची पावती देईल. जर संस्थेला, उमेदवाराच्या अर्जाच्या नमुन्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळल्यास संस्थेने अशा उमेदवाराचा प्रवेश निश्चित करू नये आणि अशा उमेदवाराने त्याच्या लॉगिनमधून ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे तक्रार/हरकत नोंदवावी. | १७-१२-२०२० | १९-१२-२०२०<br>(सायं.५.०० वाजेपर्यंत) |
| | **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी २** | | |
| ६. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे. | २०-१२-२०२० | |
| ७. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | २१-१२-२०२० | २२-१२-२०२० |
| ८. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | २४-१२-२०२० | |
| ९. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>[टिप: दुसऱ्या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांपैकी ज्यांना पहिल्यांदाच जागावाटप झालेले आहे असे सर्व उमेदवार वरील ४(क) नुसार स्वयं-पडताळणीनंतर जागेचा स्वीकार करु शकतील. दुसऱ्या फेरीत पहिल्यांदाच जागा वाटप झालेल्या उमेदवारांनी जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा भरावी.] | २५-१२-२०२० | २८-१२-२०२० |
| १०. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>[टिप: द्वितीय फेरीमध्ये पात्र उमेदवारांपैकी ज्या उमेदवारास प्रथमच जागावाटप करण्यात आले आहे किंवा जागा वाटपात सुधारणा झाली आहे किंवा या फेरीमध्ये जागा वाटपात सुधारणा झाली नाही / आधीच्या वाटप केलेल्या जागेमध्ये कोणताही बदल झालेला नाही, असे जागावाटप अंतिम असेल. प्रवेशाच्या पुष्टीकरणासाठी अशा उमेदवारांनी वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.] | २५-१२-२०२० | २९-१२-२०२०<br>(सायं.५.०० वाजेपर्यंत) |

***

| | | |
|---|---|---|
| १. | सर्व संस्थांसाठी शैक्षणिक उपक्रमांची सुरूवात | २१-१२-२०२० |
| २. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी कट ऑफ तारीख | ०७-०१-२०२१ |
| ३. | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | ०८-०१-२०२१ |

महत्वाची टीप: -

१. अंतिम गुणवत्ता यादीमध्ये ज्यांची नावे नोंदली गेली आहेत अशा सर्व प्रकारच्या उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (कॅपद्वारे) प्रवेशासाठी विचारात घेतले जाईल.

२. संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

**उमेदवारांना महत्वाच्या सूचना:**

१. एकदा उमेदवाराने संबंधित प्रवेश फेऱ्यांसाठी त्याच्या/तिच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन विकल्प अर्जाची निश्चिती केली की, उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत सादर केलेला पर्याय / प्राधान्य बदल करण्याची / रद्द करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२. संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या जागा वाटपाच्या यादीमध्ये, उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी व्यक्तिश: कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना जागावाटप पत्रे पाठविली जाणार नाहीत.

३. ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल अशा उमेदवारांनी "तात्पुरते जागावाटप पत्र" संकेतस्थळावरुन त्याच्या लॉगइन मधून डाऊनलोड करुन घ्यावे.

४. सर्व उमेदवारांसाठी जागा-स्वीकृती शुल्क ₹१,०००/- (रुपये एक हजार फक्त) एवढे आहे. उमेदवाराला जागावाटपानंतर कागदपत्रांच्या पहिल्या स्वयं-पडताळणी दरम्यान जागा-स्वीकृती शुल्क भरावे लागते. हे शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क आहे. उमेदवारांना जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करावे लागेल.

५. उमेदवार संस्थेत प्रवेश घेण्यासाठी हजर होण्याच्या वेळेस, अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवार अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मूळ प्रमाणपत्र सादर करणार नाही अशा परिस्थितीत जागावाटप आपोआप रद्द होईल व ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल. अधिसूचित वेळापत्रकानुसार कागदपत्रांच्या स्वयं-पडताळणीच्या टप्प्यावर उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

६. नंतरच्या टप्प्यात, उमेदवाराने अर्जात केलेल्या खोट्या दाव्यांवरून उमेदवाराला जागावाटप झालेले आहे असे आढळल्यास, असे जागावाटप/संस्थेमध्ये घेतलेला प्रवेश आपोआप रद्द होईल.

७. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडणारे उमेदवार महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या कोविड -१९ च्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करतील. नियुक्त केलेल्या सुविधा केंद्रांवर सामाजिक अंतर राखणे तसेच त्या ठिकाणी इच्छुक उमेदवार व पालकांची गर्दी टाळणे अत्यंत आवश्यक आहे.

८. ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.

९. राखीव प्रवर्गाचे उमेदवार म्हणून नोंदणी केलेले परंतु ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या कागदपत्रांच्या पडताळणीच्या टप्प्यात, राखीव प्रवर्गाच्या दाव्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ असलेल्या उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार समजले जाईल व त्याना ₹१०० /- चे शुल्क फरकाची रक्कम फक्त ऑनलाईन पद्धतीने भरावे लागेल.

१०. तक्रार/हरकत नोंदविण्यासाठी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडणारे उमेदवारांना सुविधा केंद्रावर कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील.

**सर्वसाधारण टिप:**

१. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात. उमेदवार सुविधाकेंद्रांवर (एफसी) उपस्थित असताना, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या कोविड -१९ च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतील.

२. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत सुरु असतील.

३. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

४. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते http://posthscdiploma2020.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

५. कोविडच्या १९ - पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्यासंदर्भात संचालनालयाकडून प्रसिद्ध केलेली प्रमाणित कार्यपद्धती, (SOP) तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

७. मदतकक्ष क्रमांक ९३२२०८३४४३/९३२६३९४९०७ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई